सातारा, मंगळवार, २८ फेब्रुवारी २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# कायद्याच्या गैरवापराद्वारे स्त्रिया पुरुषांना देतात त्रास

## अमित देशपांडे; भोसले कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**सातारा, ता. २७ :** भारतीय कायद्यामध्ये स्त्रियांना झुकते माप दिल्यामुळे या कायद्याचा गैरवापर करून अनेक स्त्रिया पुरुषांना कौटुंबिक स्वरूपाचा त्रास देत असून, कौटुंबिक छळ सहन करणाऱ्या पुरुषांची संख्या लक्षणीय आहे. या शोषणाविरोधात कुणीही बोलत नसल्याने पुरुषांची अवस्था केविलवाणी झाली आहे, असे प्रतिपादन मुंबई येथील वास्तव फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमित देशपांडे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत ते 'नारी पुरुष शोषण की समस्या' या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. देशपांडे बोलत होते.

या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. संगीता चित्रकोटी होत्या. श्री. देशपांडे म्हणाले, ''स्त्री ही अबला मानली जाते. कौटुंबिक छळासंबंधाने स्त्री अत्याचारासंबंधाने काम करणाऱ्या असंख्य संघटना आहेत. मात्र, त्या तुलनेत कौटुंबिक शोषणात पुरुषाला आधार देणाऱ्या संघटनांचा अभाव आहे.''

सत्राध्यक्ष म्हणून भूमिका मांडताना डॉ. चित्रकोटी म्हणाल्या, ''स्त्री आणि पुरुष ही समाजरथाची दोन चाके असून त्यांना समान दर्जा आहे. स्त्री आणि पुरुषांनी एकमेकांचा सन्मान केला तरच समाज निकोप राहील. स्त्रीमुक्ती म्हणजे स्त्रियांना पुरुषांकडून मुक्ती नव्हे तर पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेच्या जोखडातून स्त्रियांचे शोषण होवू नये.''

डॉ. गणेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. द. म. डांगे यांनी आभार मानले.